**अभियोग पक्षातर्फे सा.क्र.03**
देवा शपथ खरे सांगते की,

माझे नाव – भाउराव बकाराम भोयर
वय – 60 वर्षे,
धंदा – बेलदारी काम
राहणार – खापा, ता. तुमसर, जि. भंडारा.

**विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.बी. नवनागे यांच्यातर्फे साक्षदाराचा सरतपास सुरू :**

1. मी आरोपींना ओळखतो. ते आमच्याच गावात राहतात. घटनेला एक वर्षापेक्षा जास्त वेळ झाला आहे. त्यादिवशी रात्री 9.00 वाजता मी झोपलो होतो त्यावेळेस विनोद हलमारे, काशिनाथ हलमारे आणि पांडे हे माझे घरी आले होते. तिघांनी माझ्या घ रवालीला शिविगाळ केले. माझ्या पोराचा हात खेचून बाहेर काढले. आवाजामुळे मी घ राबाहेर निघालो. काशिनाथ हलमारे यांनी माझ्या मुलाला मारहाण केली. काशिनाथ हलमारे यांनी माझ्या पत्नीचा हात धरून खेचले. तिच्या हाताच्या बांगळया फुटल्या. माझया पत्नीला 'तु रोडावर ये, मी तुला हेपतो' अशी शिविगाळ केली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन तुमसरला रिपोर्ट देण्याकरिता आलो.

सरतपास पूर्ण.

**उलट तपास : आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.आर. माटे यांच्यामार्फत सुरू :–**

2. पोलीसांनी माझे बयान पोलीस स्टेशनमध्ये घेतले होते. पोलीसांनी रिपोर्ट दिला त्यावेळेस माझे बयान घेतले. असे काही घडले नाही की रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला बोलाविले. मी पोलीसांना बयान देते वेळेस ''तिघांनी माझ्या घरवालीला शिविगाळ केली होती, आवाजामुळे मी घराबाहेर निघालो'' असे सांगीतले होते. आत मला माझे बयान दाखविण्यात आले. त्यामध्ये सदरचा मजकूर नमूद नाही. सदरचा मजकूर माझे बयानात कां नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. असे काही घडले नाही की त्यावेळेस मी, माझा मुलगा, माझी पत्नी, माझी मुलगी असे आम्ही जेवण करीत होतो.

<u>प्रश्न</u> :– तुमच्या बयानामध्ये तुम्ही, तुमला मुलगा, मुलगी व पत्नी जेवण करीत होते असेलिहिलेले आहे.

<u>उत्तर</u> :– ते जेवण करीत होते, मी झोपलो होतो.

3. हे म्हणणे खरे आहे की मी जेवण करीत होतो असे माझे बयानात चुकीचे लिहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपींनी मला कोणतीही शिविगाळ केली नाही. मी पोलीसांना बयान देते वेळेस ''माझया पत्नीला 'तु रोडावर ये, मी तुला हेपतो'' असे सांगीतले होते. आता मला माझे बयान दाखविण्यात आले आहे. त्यामध्ये सदरचा मजकूर तंतोतंत नमुद नाही. (सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला आहे की सदरची बाब ही प्रिंट

मिस्टेक असू शकते.) सदरचा मजूकर तंतोतंत माझे बयानात कां नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

<u>प्रश्न</u> :– तुम्ही झोपले होते तुम्हाला काही माहित नव्हते.

<u>उत्तर</u> :– ते ओरडल्यानंतर मला जाग आला.

<u>प्रश्न</u> :– तुम्ही झोपल्यामुळे तुमच्या घरी कोण आले होते हे तुम्हाला माहित नाही.

<u>उत्तर</u> :– हो.

4. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझ्या गावचे असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की तिघांनी माझ्या पत्नीला शिविगाळ केल्याचे, माझ्या मुलाचा हात खिचून बाहेर काढल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की काशिनाथ हलमारे यांनी माझ्या मुला मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की काशिनाथ हलमारे यांनी माझ्या पत्नीचा हात खेचल्याचे व बांगळया फोडल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्या पत्नीला 'तु रोडावर ये, मी तुला हेपतो'' अशी शिविगाळ केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा सचिन हा खुणाच्या केसमध्ये जेलमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा बजरंग दलाचा सदस्य आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा राजकारणात आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या मुलाची पोलीसांसोबत चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या मुलाने माझ्या पत्नीला खोटी रिपोर्ट देण्यास सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण.

**<u>फेर तपास</u> : काही नाही**

समक्ष,
श्रवणोत्तर स्विकृत,
स्वाक्षरी/–
(के.पी. दवने)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तुमसर.

दि. 08/11/2023.